# MPSC

## प्रचलित घडामोडी

### स्पेशल कोर्स (मराठी)




Headlines: २ डिसेंबर ते ८ डिसेंबर २०१९

९ डिसेंबर २०१९

# हेडलाईन्स

## भारत – जपान 2+2 संवाद

- भारत आणि जपान यांच्यात नवी दिल्ली येथे पहिला परराष्ट्र संरक्षण मंत्रिपरिषद संवाद (2+2) पार पडला.
- या बैठकीत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व संरक्षण मंत्री राजनाथ सिंह व परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केले. तर जपानी प्रतिनिधी मंडळाचे परराष्ट्रमंत्री तोशिमित्सु मोहेगी व संरक्षण मंत्री तारो कोनो यांनी केले.
- हा 2+2 मंत्रिस्तरीय संवाद म्हणजे दोन्ही देशांच्या परराष्ट्र संरक्षण सचिवांमधील बैठकीची पुढची पायरी आहे. ही सचिवस्तरीय बैठक 2010 मध्ये पार पडली होती.
- ऑक्टोबर 2018 मध्ये जपानमध्ये आयोजित 13व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत नरेंद्र मोदी आणि शिंजो ॲबे यांच्यातील करारानुसार हा संवाद आयोजित करण्यात आला.
- या संवादाद्वारे दोन्ही देशांना संरक्षण व सुरक्षा सहकार्य बळकट करण्याच्या दृष्टीने पुढील विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध झाली.

## जागतिक समावेशक समृद्धी निर्देशांक

- उत्तर स्पेनच्या बिलबाओमध्ये प्रथमच जागतिक समावेशक समृद्धी निर्देशांक प्रसिद्ध करण्यात आला.
- यानुसार जागतिक आर्थिक व सामाजिक समावेशनाच्या बाबतीत या निर्देशाकांत जगातील पहिल्या 113 शहरांमध्ये 3 भारतीय शहरांना स्थान देण्यात आले आहे.
- मुंबई 107व्या, दिल्ली 101व्या, बेंगळुरू 83व्या स्थानावर आहे.
- पहिली तीन शहरे अनुक्रमे : 1. झ्युरीच, 2. व्हिएन्ना, 3. कोपेनहेगन
- या यादीत बिलबाओ 20 व्या क्रमांकावर आहे.
- चीनचे तेपेई (6व्या स्थानी) शहर पहिल्या 20 शहरांमध्ये स्थान मिळविणारे एकमेव आशियाई शहर आहे.
- या यादीमध्ये इजिप्तमधील काहिरा हे शहर सर्वात शेवटी म्हणजे 113व्या स्थानी आहे.
- हे निर्देशांक वास्क संस्थेच्या वतीने डि अँड एल पार्टनर्सनी तयार केला आहे.
- हा निर्देशांक केवळ शहराचा आर्थिक विकासच दर्शवीत नाही, तर विकासाची गुणवत्ता व लोकांमध्ये त्याचे वितरण देखील दर्शवितो.
- या निर्देशांकातील अभ्यासांचे 3 मुख्य आधारस्तंभ आहेत.
  1) उत्पन्न व उत्पन्नाचे वितरण
  2) समाजातील विविध सामाजिक गटांचा सहभाग
  3) राहणीमान

## जल तंत्रज्ञान व पर्यावरण नियंत्रण परिषद

- इस्रायलमध्ये आयोजित जल तंत्रज्ञान व पर्यावरण नियंत्रण परिषदेत जलशक्ती मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले.
- या परिषदेत अनेक देशांनी आपले तंत्रज्ञान व उपाय प्रदर्शित करण्यासाठी भाग घेतला.
- जल व्यवस्थापनाच्या बाबतीत इस्रायल हा देश जगातील आदर्श देश मानला जातो. या देशात 80 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा शेतीसाठी पुनर्वापर केला जातो.
- ठिबक सिंचन आणि समुद्राच्या पाण्याचे पृथक्करण करून, आज हा देश शेतीत जागतिक स्तरावर अग्रणी बनला आहे.
- अशा परिषदेमध्ये भाग घेतल्याने भारताला पाण्याचे संवर्धन करण्यासाठीचे तंत्रज्ञान शिकण्यास मदत होईल.

## बोर्निया जंगल आगीच्या भक्ष्यस्थानी

- दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन जंगलातील आगीनंतर आता दक्षिण पूर्व आशियातील बोर्निया जंगलांत अभूतपूर्व अशी आग लागली आहे.
- 'बोर्निया' जंगल हे तीन देशांत पसरलेले आहे.
- इंडोनेशिया, मलेशिया, आणि ब्रुनेई.
- चार लाख चौरस किलोमीटर क्षेत्रात याचा विस्तार.
- हे जगातील दुसरे सर्वधिक जुने वर्षावन आहे.
- पहिले : 'ड्रेनट्री' वर्षावन ऑस्ट्रेलिया.

**बोर्निया जंगलाचे वैशिष्ट्य**

- सुमात्रियन गेंड्याचे वास्तव्य
- सुमात्रियन गेंडा हा 'IUCN'च्या 'Critically Endangered' वर्गात समाविष्ट आहे त्याची जगातील संख्या केवळ 8 एवढी आहे.

- या जंगलातून प्रमुख्याने रबर व तेलबिया यांचे उत्पादन घेतले जाते.

**जगातील काही प्रमुख वने**

- तैगा वने - आशिया, युरोप, उत्तर अमेरिका.
- अमेझॉन - दक्षिण अमेरिका
- काँगो वर्षावने - आफ्रिका
- वाल्दीवियन वर्षावाने - दक्षिण अमेरिका
- टोंगास वने - उत्तर अमेरिका
- सुंदरबन वने - दक्षिण आशिया

## मुंबई सेंट्रल हे 'ईट राईट स्टेशन' असे प्रमाणपत्र मिळवणारे देशातील पहिले रेल्वे स्थानक

- मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक FSSAI कडून 'एट राइट स्टेशन' (Eight Right Station) हे प्रमाणपत्र मिळवणारे देशातील पहिले रेल्वे स्थानक ठरले आहे.

**काय आहे 'एट राइट इंडिया' चळवळ :**

- भारतीय खाद्यान्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) यांनी 2018 मध्ये ही चळवळ सुरू केली.
- प्रवाशांना निरोगी आणि स्वच्छ व दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी ही मोहीम राबविण्यात आली.

**या प्रमाणपत्रासाठी खालील घटकांचे सर्वेक्षण करण्यात येते :**

i) खाद्यान्न सुरक्षा व स्वच्छतेसंबंधी नियमांची अंमलबजावणी.

ii) निरोगी आहाराची उपलब्धता

iii) अन्न पुरवठा केंद्र

iv) खरकट्या कचऱ्याचे व्यवस्थापन

v) अन्नपदार्थांची हाताळणी

vi) स्थानिक आणि हंगामी खाद्यपदार्थांची जाहिरात

vii) जनजागृती

**भारतीय खाद्यान्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI):**

**स्थापना :** 2011मध्ये केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रायलयाअंतर्गत

**उद्दिष्ट :** भारतामध्ये खाद्यान्न सुरक्षा आणि त्याच्या नियमनाशी संबंधित कायदेशीर चौकट प्रदान करण्यासाठी.

**कायदा :** खाद्यान्न सुरक्षा आणि मानके अधिनियम - 2006 या कायदाअन्वये स्थापना

**मुख्यालय :** दिल्ली

- ही एक स्वायत्त संस्था आहे.

## विधानसभा अध्यक्षपदासाठी नाना पटोले यांची बिनविरोध निवड

- महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षपदासाठी महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे उमेदवार 'नाना पटोले' यांची बिनविरोध निवड झाली आहे.
- भाजपकडून किसन कथोरे यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला गेल्यानंतर ही निवड झाली आहे.
- नव्याने निवडून आलेल्या विधानसभेच्या सदस्यांकडून सदनाच्या पहिल्या बैठकीत अध्यक्षांची निवड केली जाते .
- यासाठी पहिल्या बैठकीचे हंगामी अध्यक्षपद राज्यपालांकडून सदनातील सर्वात ज्येष्ठ व्यक्तीस दिले जाते व त्यांच्या मार्फत बहुमताची प्रक्रिया पार पाडून कायमस्वरूपी अध्यक्षाची निवड केली जाते.
- अध्यक्षांचा कालावधी विधानसभेच्या कालावधी इतकाच म्हणजे पाच वर्ष असतो.

## लोकसभेत 'कर आकारणी (दुरुस्ती) विधेयक-2019' ला मंजूरी

- लोकसभेत 'कर आकारणी (दुरुस्ती) विधेयक-2019' ला मंजूरी देण्यात आली आहे.
- हा कायदा सप्टेंबर 2019 मध्ये राष्ट्रपतींनी लागू केलेल्या अध्यादेशाची जागा घेणार आहे.
- या विधेयकामुळे 'उत्पन्न कर कायदा-1961' आणि 'वित्त कायदा-2019' या दोन्हीमध्ये दुरुस्ती करण्यात येणार आहे.

**ठळक बाबी ;**

- या विधेयकाने कॉर्पोरेट कर कमी करण्यात आला असून तो विना अनुदानाशिवाय 22 टक्के एवढा करण्यात आला आहे आणि नवीन उत्पादन संस्थांसाठी तो 15% पर्यंत कमी करण्यात आला आहे.
- सध्या वार्षिक 400 कोटी रुपयांपर्यंतची उलाढाल असलेल्या स्थानिक कंपन्या 25 टक्के या दराने उत्पन्न कर भरीत आहेत.
- तर इतर स्थानिक कंपन्यांसाठी कर दर 30 टक्के आहे.

- या विधेयकामुळे उत्पादन क्षेत्रात अधिक गुंतवणूक होणे अपेक्षित आहे.
- मागील 28 वर्षांमध्ये झालेली ही सर्वात मोठी कपात आहे.

## भारताला मिळणार पहिले केंद्रीय संस्कृत विद्यापीठ

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळाने केंद्रीय संस्कृत विद्यापीठाच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.
- देशात तीन संस्कृत अभिमत विद्यापीठे आहेत त्या तीन संस्कृत अभिमत विद्यापीठांचे एक केंद्रीय विद्यापीठ असेल.
- महत्त्वाचे म्हणजे देशातील संस्कृत महाविद्यालयांमधील एकूण 709 पदे रिक्त आहे. ती सारी पदे व्याख्यात्यांची आहेत.
- देशात एकूण 760 संस्कृत महाविद्यालये सुरू आहेत, त्यापैकी 468 उत्तरप्रदेशात आहेत. संस्कृत महाविद्यालयांच्या संख्येच्या बाबतीत ओदिशा 59 महाविद्यालयांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

UGC –University Grants Commission
**विद्यापीठ अनुदान आयोग.**

- भारतातील आधुनिक उच्च शिक्षण पद्धतीची सुरुवात 1823 च्या एलफिन्स्टन मिनिट्सपासून होते.
- 1835 मध्ये मेकॉलेने देशातील इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला.
- 1854च्या वूड यांच्या खलित्याला ‘भारतातील इंग्रजी शिक्षणाचा मॅग्ना कार्टा’ असे संबोधले जाते.
- 1857 मध्ये कलकत्ता, बॉम्बे, मद्रास येथे व 1887 मध्ये अलाहाबाद येथे विद्यापीठे स्थापन करण्यात आली.
- 1925 मध्ये ‘आंतरविद्यापीठ मंडळ’ स्थापन करण्यात आले.
- 1944 मध्ये भारतातील युद्धोत्तर शैक्षणिक विकासावरील केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालास ‘सार्जंट अहवाल’ असे म्हणतात.
- 1945 मध्ये विद्यापीठ अनुदान समिती स्थापन करण्यात आली. तसेच 1948 मध्ये राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोग स्थापन करण्यात आला.
- 28 डिसेंबर 1953 रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना झाली. वैधानिक संस्था म्हणून औपचारिकरीत्या विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना नोव्हेंबर 1956 मध्ये संसदीय कायद्याद्वारे करण्यात आली.
- **आयोगाचे घोषवाक्य :** ‘ज्ञानविज्ञानविमुक्तये’

## मानव संसाधन विकास मंत्रालयाचे ‘कर्तव्य पोर्टल’

- 26 नोव्हेंबर 2019 रोजी 70 व्या संविधान दिनानिमित्त केंद्रीय मंत्री रमेश पोखरियाल यांनी विद्यार्थ्यांसाठी मासिक निबंध स्पर्धा आयोजित करण्यासाठी कर्तव्य पोर्टल (Kartavyes.ugc.ac.in) सुरू केले आहे.
- ‘नागरिक कर्तव्य पालन अभियान’ चा भाग म्हणून हे पोर्टल सुरू केले आहे.
- मानव संसाधन विकास मंत्रालयाअंतर्गत उच्च शिक्षण विभाग वर्षभरात राष्ट्रीय निबंध स्पर्धेच्या 11 फेऱ्या घेणार आहे.
- निबंधाचे विषय दरमहा एका मूलभूत कर्तव्यावर (राज्यघटनेत नमूद केलेल्या) आधारित असतील.
- निबंध हिंदी किंवा इंग्रजीमध्ये लिहिले जाऊ शकतात.

**नागरिक कर्तव्य पालन अभियान :**

- वर्ष 2019 हे भारतीय राज्यघटना स्विकारण्याचे 70 वे वर्ष आहे.
- राज्यघटनेत नमूद केलेल्या मूलभूत कर्तव्यांबद्दल जनजागृती करण्यासाठी केंद्र सरकारने 26 नोव्हेंबर 2019 ते 26 नोव्हेंबर 2020 पर्यंत नागरीक कर्तव्य पालन अभियान चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

## एक देश, एक रेशन कार्ड योजना

- ‘एक देश एक रेशन कार्ड’ योजनेची १ जून २०२० पासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
- स्थलांतरित कामगार आणि रोजंदारी मजूर हा वर्ग रोजगारासाठी सातत्याने देशभरात फिरतीवर असतो त्यामुळे यांना प्रामुख्याने ‘एक देश एक रेशन कार्ड’ योजनेचा लाभ होणार आहे.

- या योजनेनुसार पात्र लाभार्थ्यांला 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा 2013 नुसार' देशातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानातून त्याच्याकडे असलेल्या रेशन कार्डचा वापर करून अन्नधान्य घेता येणार आहे.
- बायोमेट्रिक अथवा आधार वैधतेनंतर अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.
- ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरणमंत्री - रामविलास पासवान.

**रेशन कार्ड**

- रेशन कार्ड हे प्रत्येक राज्यामार्फत लाभार्थ्यांना मुख्यत्वे सार्वजनिक वितरण प्रणालीतून अन्नधान्य प्राप्त करण्यासाठी वितरित केले जाते.
- सर्वसाधारणपणे ओळखपत्र म्हणूनही याचा उपयोग होतो.
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा २०१३ नुसार दोन प्रकारची रेशन कार्ड उपलब्ध करून दिली जातात.

१) प्रायोरिटी रेशन कार्ड - यानुसार कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला पाच किलो अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते
२) अंत्योदय रेशन कार्ड - यानुसार गरिबातील गरीब कुटुंबाला 35 किलोपर्यंत अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते.

## NCERT कडून नर्सरी साठी अभ्यासक्रम निश्चित

- NCERT ने सुधारित नर्सरीच्या अभ्यासक्रमात काय शिकवावे, मूल्यमापन कसे करावे याविषयीच्या सूचना दिल्या आहेत.
- मातृभाषेतून शिक्षण : राष्ट्रीय शिक्षण धोरणात या बद्दलचे महत्त्व सांगितले आहे की लहानपणी जी भाषा कानावर पडते त्या भाषेत शिक्षण घेणे सोयीचे जाते.

**शिक्षण हक्क कायदा 2009 :**

- या कायद्याच्या कक्षा रुंदावणार असून 6 ते 14 वयोगट आता 3 ते 14 करण्यात येईल.
- यासाठी सध्या 'महिला व बाल विकास' मंत्रालयाकडे असणाऱ्या बालवाड्या केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे व राज्यस्तरावर शिक्षण विभागाकडे येणे आवश्यक असेल.
- जर 25 विद्यार्थ्यांमागे 1 शिक्षक अशी नव्याने तरतूद करण्यात आली.

## क्रेडिट लिंक्ड अनुदान योजना आवास पोर्टल

- केंद्रीय गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालयाने क्रेडिट लिंक्ड अनुदान योजना सुरू केली.
- या पोर्टलद्वारे, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अनुदान मिळवण्यास इच्छुक असलेले लाभार्थी आपल्या अर्जाची स्थिती जाणून घेऊ शकतात.
- हे पोर्टल लाभार्थ्यांना वेळेत अनुदान देता यावे यासाठी इतर भागधारकांना मदत करेल.
- पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत केंद्र सरकारद्वारे व्यक्तींना गृह कर्जावर 2.67 लाख रूपयांचे व्याज अनुदान दिले जाते.

**पंतप्रधान आवास योजना (शहरी) :**

- पंतप्रधान आवास योजनांचा उद्देश 2022पर्यंत शहरी भागात राहणाऱ्या सर्व गरीब लोकांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देणे हा आहे.
- 2015-2022 दरम्यान शहरी भागांसाठी 'सर्वांसाठी घरे' हे अभियान राबवण्यात येत आहे.
- हे अभियान राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या माध्यमांतून पात्र असलेल्या सर्व लाभार्थींना 2022 पर्यंत घरे प्रदान करण्याच्या कार्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना केंद्रीय मदत होईल.
- 2011 च्या जनगणनेनुसार सर्वाधिक लोकसंख्येच्या 4041 शहरांपैकी 500 प्रथम श्रेणी शहरांवर सुरुवातीला केले जाणार आहे.

## ऑपरेशन 'क्वीन आर्ट'

- मुंगसांच्या केसांचा अवैध व्यापार रोखण्यासाठी वन्यजीव अपराध नियंत्रण ब्यूरोद्वारे ऑपरेशन क्वीन आर्ट राबविण्यात आले.
- या मोहिमेअंतर्गत विविध राज्यात मुंगुसाच्या केसांपासून बनविलेले ब्रश मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आले.
- देशभरात मुंगसाच्या एकूण 7 प्रजाती आढळतात.
- भारतात इंडियन ग्रे प्रजातीचे मुंगुस सर्वाधिक आढळतात. त्यांची मोठ्या संख्येने शिकार केली जाते.
- देशातील बहुतांश ब्रशचे उत्पादन उत्तर प्रदेशातील शेरकोट येथे केले जाते. त्यास ब्रश उत्पादनाची राजधानी म्हणतात.
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या भाग 2 अंतर्गत मुंगसाची नोंद आहे. या अंतर्गत मुंगुस पाळणे,

त्याची शिकार करणे, व त्याचा व्यापार करणे यासाठी 7 वर्षापर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

## महालेखा नियंत्रकपदी सोमा रॉय बर्मन

- केंद्र सरकारने सोमा रॉय बर्मन यांची महालेखा नियंत्रकपदी नियुक्ती केली आहे.
- महालेखा नियंत्रकपदी नियुक्ती झालेल्या त्या 7व्या महिला व एकूण 24व्या सीजीए आहेत.
- सोमा रॉय बर्मन या 1986 च्या भारतीय नागरी लेखा सेवा अधिकारी आहेत.
- बर्मन यांनी गृह माहिती व प्रसारण, उद्योग, मनुष्यबळ विकास, अर्थ तसेच रस्ते वाहतूक व महामार्ग आदी मंत्रालयामध्ये महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.
- त्यांनी सीजीए कार्यालयामध्ये अतिरिक्त महालेखानियंत्रक म्हणूनही काम केले आहे.

## पृथ्वीराजसिंह रूपन – मॉरिशसचे नवे राष्ट्राध्यक्ष

- मॉरिशसच्या संसदेने पृथ्वीराजसिंह रूपन याची देशाचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड केली आहे.
- उपराष्ट्राध्यक्ष म्हणून मेरी सिरील एडी बॉईसेझॉन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- पृथ्वीराज सिंह रूपन यांनी माजी राष्ट्राध्यक्ष अमिना गुरिब फकीम यांची जागा घेतली आहे.
- पृथ्वीराजसिंह रूपन एक वकील आहेत. 2000 मध्ये ते सर्वप्रथम राष्ट्रीय सभेवर निवडून आले होते. त्यांनी कला व संस्कृती सामाजिक एकत्रीकरण आणि प्रादेशिक प्रशासनाचे मंत्रिपद सांभाळले आहे.
- मॉरिशसमध्ये पंतप्रधान हे सरकार प्रमुख असतात. राष्ट्राध्यक्ष राष्ट्रप्रमुख असतात. पण त्यांच्याकडे कार्यकारी सत्ता नसते. त्यांना केवळ घटनेचे संरक्षक मानले जाते.

## 'पार्टिकल्स' सिनेमाला सुवर्ण मयूर पुरस्कार

- सुवर्ण महोत्सवी भारतीय 'आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा' शानदार सोहळा पार पडला.
- फ्रान्सच्या 'पार्टिकल्स' सिनेमाला उत्कृष्ट चित्रपटासाठीचा मयूर पुरस्कार देण्यात आला.
- रोख 40 लाख रूपये, चषक व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
- International film festival of India's (IFFI) स्थळ : गोवा
  सुरुवात : 24 जानेवारी 1952
- 1952 मध्ये सुरू करण्यात आलेला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (IFFI) हा आशियातील महत्त्वपूर्ण चित्रपट महोत्सवांपैकी एक आहे. गोवा राज्यात दरवर्षी आयोजित होणाऱ्या या महोत्सवाचे उद्दिष्ट जगातील चित्रपटसृष्टींना चित्रपटाच्या कलेचे उत्कृष्ट प्रदर्शन करण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे आहे.
- विविध राष्ट्रांच्या चित्रपट संस्कृतीच्या त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा समजून घेणे आणि कौतुक करणे हे या समारंभाचे व पुरस्काराचे ध्येय आहे. हा पुरस्कार जगातील लोकांच्या मैत्री आणि सहकार्यात वाढ करण्यास प्रोत्साहन देतो.
- माहिती व प्रसारण मंत्रालय, चित्रपट महोत्सव संचालनालय आणि गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित केला जातो.

**2019 चे काही विजेते :**

1) सेऊ जॉर्ज यांना सर्वोकृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार.
(चित्रपट : मारीघेता मधील कार्लोस भूमिकेसाठी)

2) **उषा जाधव यांना सर्वोत्तम अभिनेत्रीचा पुरस्कार**
(माई घाट : क्राईम नं. 103/2005 या मराठी चित्रपटातील प्रभा माईन या व्यक्तिरेखेसाठी)

- रौप्य मयूर, प्रमाणपत्र आणि 10 लाख रूपये प्रत्येकी असे सर्वोत्तम अभिनेता आणि सर्वोत्तम अभिनेत्री पुरस्काराचे स्वरूप आहे.

**3) विशेष ज्युरी पुरस्कार पेमा त्सेपेन यांच्या 'बलून' चित्रपटाचा**

- पुरस्कारचे स्वरूप : रौप्य मयूर, प्रशस्तिपत्र आणि 15 लाख रुपये.
- हेल्लारो चित्रपटाला विशेष पुरस्कार
- चित्रपटात मांडण्यात आलेला महिला सबलीकरणाचा विषय आजच्या काळाशीही सुसंगत असल्याचे परिक्षकांनी सांगितले.

## आशिया–पॅसिफिक स्क्रीन पुरस्कार

- या पुरस्काराची घोषणा ऑस्ट्रेलियामधील ब्रिस्टेन येथे करण्यात आली.
- या पुरस्काराद्वारे आशिया–पॅसिफिक क्षेत्रातील जवळपास

70 देशांमधील चित्रपटांमधून सांस्कृतिक वारसा आणि आशिया पॅसिफिकमधील विविधता प्रतिबिंबित करणाऱ्या सर्वोकृष्ट चित्रपटांचा सन्मान केला.

**2019 चे पुरस्कार विजेते :**

- सर्वोत्कृष्ट चित्रपट : 'पॅसाईट' (दिग्दर्शक : बोंगजुन हो – दक्षिण कोरिया)
- सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : मॅक्स टूगेनमन (वर्डिक्ट)
- सर्वोत्कृष्ट अभिनेता : मनोज वाजपेयी (भोसले)
- या पुरस्काराची सुरुवात 2007मध्ये झाली. तेव्हापासून युनेस्को इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिल्म प्रोड्यूसर असोशिएशन आणि ब्रिस्बेन सिटी कौन्सिल (ऑस्ट्रेलिया) यांच्याद्वारे हे पुरस्कार प्रतिवर्षी प्रदान केले जातात.
- या पुरस्कारांद्वारे आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील दिग्दर्शक, चित्रपट, अभिनेते आणि संस्कृतींचा सन्मान केला जातो, तसेच प्रोत्साहन दिले जाते.

## रवांडा चित्रपटाला ICFT युनेस्को गांधी पदक

- रिकार्डो सालवेट्टी दिग्दर्शित 'रवांडा' या चित्रपटाने ICFT – युनेस्को गांधी पदक पटकाविले आहे.
- पॅरिसमधील इंटरनॅशनल कौन्सिल फॉर फिल्म टेलिव्हिजन अ‍ॅण्ड ऑडिओ व्हिज्युअल कम्युनिकेशन आणि युनेस्को यांच्यातर्फे हा पुरस्कार देण्यात आला. ICFT – युनेस्को गांधी पदक विशेष पुरस्कार संजय पी. सिंग चौहान दिग्दर्शित 'बहत्तर हूरे' या चित्रपटाला देण्यात आला.
- नोव्हेंबर 2019 मध्ये पार पडलेला भारतीय आंतरराष्ट्रीय महोत्सवाचा 50 सोहळा होता.

## आरोग्य क्षेत्रातील सेवेबद्दल 'फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराचे' दिल्लीत वितरण

- आरोग्य क्षेत्रातील सेवेबद्दल 'फ्लोरेन्स नाइटिंगेल' पुरस्काराने दिल्ली येथे गुरूवार 5 नोव्हेंबर 2019 रोजी सन्मान करण्यात आला. महाराष्ट्रातील दोन पारिचारिकांना गुरुवारी भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने गौरविण्यात आले.
- चंद्रपूर जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयातील छाया पाटील आणि जळगाव जिल्ह्यातील लसूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सहाय्यक आशा गजरे यांचा त्यात समावेश आहे.
- केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने विज्ञान भवनात राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार 2019 चे वितरण करण्यात आले. देशातील 35 पारिचारिकांचा यावेळी गौरव करण्यात आला.
- हा पुरस्कार फ्लोरेन्स नाइटिंगेल या महिलेच्या स्मरणार्थ दिला जातो. या पुरस्काराची सुरुवात 1912 मध्ये झाली. नर्सिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो. हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार आहे. फ्लोरेन्स नाइटिंगेल यांना आधुनिक नर्सिंग आंदोलनाच्या जन्मदाता मानले जाते.
- चंद्रपूर छाया पाटील 29 वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात कार्यरत आहेत. जिल्ह्यातील आदिवासी भागात 17 वर्षे सेवा त्यांनी दिली आहे. तसेच गेली 10 वर्षे त्या शहरी भागातील आरोग्य सेवेत कार्यरत होत्या. 2015-16 लसीकरण अभिनयात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
- लसुर प्राथमिक केंद्रातील आरोग्य सहाय्यक आशा गजरे या गेली 33 वर्षे आरोग्य क्षेत्रात कार्यरत आहेत. 28 वर्षे शहरी तर 5 वर्षे आदिवासी भागात सेवा दिली आहे.

## टोनी जोसेफ यांना शक्ती भट्ट पुरस्कार

- इंग्रजी लेखक टोनी जोसेफ त्यांचे 'अर्ली इंडियन्स द स्टोरी ऑफ अ‍ॅन्सेस्टर्स अँड व्हेसर वी केम फ्रॉम' या पुस्तकासाठी 12 वा शक्ती भट्ट पुस्तक पुरस्कार जाहीर झाला.
- टोनी जोसेफ लेखक व पत्रकार आहेत.
- अर्ली इंडियन्स या आपल्या पुस्तकात दक्षिण आशियाच्या लोकांची कथा संशोधनातून सांगितली आहे. यात नवीन डीएनए पुराव्यांचा समावेश आहे.
- दक्षिण आशियाई देशांमधील सर्व शैलींतील उल्लेखनीय लेखनासाठी नवीन लेखकांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात येतो.
- 2008 साली या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली.
- या पुरस्काराचे स्वरूप चषक आणि दोन लाख रुपये असे आहे.

- 2018 चा पुरस्कार सुजाता गिटाला यांच्या 'आंट्स् अमाँग एलिफंटस्' या पुस्तकाला प्राप्त झाला होता.

## डॉ. सतीश रेड्डी यांना एअरोस्पेस क्षेत्रातील सर्वोच्च फेलोशिप

- संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे (डीआरडीओ) प्रमुख 'रॉकेटमन' म्हणून प्रसिद्ध असलेले वैज्ञानिक डॉ. जी. सतीश रेड्डी युनायटेड किंगडमच्या एरोनॉटिकल ॲकॅडमीतर्फे मानद फेलोशिप देण्यात आली.
- एअरोस्पेस क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कार्यासाठी ही फेलोशिप प्रदान केली जाते. याला एअरोस्पेस क्षेत्रातील नोबेल पुरस्कार मानले जाते.
- ही मानद फेलोशिप सर्वप्रथम 1917 मध्ये ऑर्विल राईट आणि विल्बर राईट यांचा प्रदान करण्यात आली होती.
- हा मान मिळविणारे डॉ. रेड्डी हे पहिलेच भारतीय आहेत.

## पृथ्वी-२ या अण्वस्त्रवाहक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

- ओदिशा राज्यातील बालासोर जिल्ह्यात चांदीपूर चाचणी क्षेत्रात इंटिग्रेटेड टेस्टरेंज येथे ही चाचणी घेण्यात आली.
- संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने विकसित केलेले हे स्वदेशी क्षेपणास्त्र आहे.
- जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे 9 मीटर उंचीचे हे क्षेपणास्त्र आहे.
- या क्षेपणास्त्राचा मारक पल्ला 350 किलोमीटर्सचा असून हे क्षेपणास्त्र 500 ते 1000 किलो स्फोटके वाहून नेण्यास सक्षम आहे.
- त्याच्या दोन इंजिनांमध्ये द्रव इंधनांचा वापर करण्यात आला आहे.
- लक्ष्य शोधण्यासाठी या क्षेपणास्त्रात प्रगत दिशादर्शन प्रणालीचा वापर केलेला आहे.

## अग्नी – 3 ची यशस्वी चाचणी

- भारताने ओदिशामदील एपीजे अब्दुल कलाम तळावरील बालासोर चाचणी केंद्रामधून अग्नी-3 ची रात्रीच्या वेळी घेण्यात आलेली पहिली चाचणी यशस्वी ठरली.
- यापूर्वी या क्षेपणास्त्रांच्या अग्नी – 1, आणि अग्नी-2 या आवृत्त्यांच्या रात्रीच्या वेळी घेण्यात आलेल्या चाचण्याही अपयशी ठरल्या होत्या.
- हे मध्यम श्रेणीचे स्वदेशी क्षेपणास्त्र आहे.
- हे क्षेपणास्त्र पृष्ठभागावरून पृष्ठभागावर मारा करण्यास सक्षम आहे.
- हे क्षेपणास्त्र 3500 किलोमीटरपर्यंत मारा करते.
- अग्नी – 3 : वजन 50 टन
- 1.5 टनापर्यंतची अण्वस्त्रे वाहून नेऊ शकते.
- लांबी : 17 मीटर
- व्यास : 2 मीटर
- या क्षेपणास्त्राची पहिली मध्यरात्री घेण्यात आलेली चाचणी होती.
- हे क्षेपणास्त्र भारतीय संरक्षण संशोधन व विकास संस्थेने (DRDO) ने विकसित केले आहे.

## मित्रशक्ती सैन्य अभ्यास, 2019

- हा युद्धसराव भारत आणि श्रीलंका 1 ते 4 डिसेंबर या कालावधीत आयोजित केला गेला.,
- हा युद्धसराव मित्रशक्ती सैन्य अभ्यासाचा सातव्या आवृत्तीचा युद्धसराव आहे.
- हा युद्धसराव विदेशी प्रशिक्षण नोड पुणे येथे आयोजित केला गेला.
- या युद्धासरावाची सहावी आवृत्ती श्रीलंकेत पार पडली. याचे आयोजन प्रतिवर्षी भारत व श्रीलंकेमध्ये क्रमाक्रमाने केले जाते.
- उद्देश : या संयुक्त प्रशिक्षण अभ्यासाचे उद्दिष्ट भारत आणि सैन्यात सकारात्मक संबंध निर्माण करणे आणि वाढविणे हे आहे.
- या व्यतिरिक्त संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आदेशानुसार शहरी व ग्रामीण वातावरणातील दहशतवादी कारवायांचा सामना करण्याच्या प्रशिक्षणावर भर देणे.

## सूर्य किरण – 14

- सूर्य किरण – 14 या भारत व नेपाळ लष्करादरम्यानचा 14 व्या द्विपक्षीय वार्षिक लष्करी सरावाला नेपाळमधल्या रूपनदेही जिल्ह्यातल्या नेपाळ लष्कर युद्धशाळा येथे प्रारंभ झाला.
- सूर्य हा या लष्करी सरावाची यापूर्वीची आवृत्ती आहे.
- सूर्यकिरण-13 चे आयोजन जून 2019 मध्ये

उत्तराखंडमधील पिथोरागड येथे करण्यात आले होते.

- यामध्ये जंगलातील युद्ध, डोंगराळ भागातील दहशतवाद विरोधी मोहीम, आपत्ती निवारण या विषयांचा समावेश आहे.
- दहशतवादविरोधी कारवायांविरुद्ध दोन्ही देशांमधील सैन्यामध्ये समन्वय प्रस्थापित करणे हा या सरावाचा हेतू आहे.
- या युद्धसरावात यावर्षी दोन्ही देशांचे एकूण 300 सैनिक सहभागी होणार आहेत.
- सूर्यकिरण, युद्धसराव प्रतिवर्षी भारत व नेपाळ या देशांमध्ये क्रमाक्रमाने आयोजित करण्यात येतो.

## मिलन 2020 : बहुराष्ट्रीय युद्धसराव

- भारतीय नौदल मार्च 2020 मध्ये विशाखापट्टनम येथे मिलन 2020 नामक नौदल सराव आयोजित करणार आहे.
- मिलन ही एक द्विपक्षीय नौदल सरावांची शृंखला आहे. त्याची सुरूवात 1995 पासून झाली.
- गेल्या वर्षापर्यंत या सरावाचे आयोजन अंदमान-निकोबार कमांडमध्ये केले जात होते. यावर्षी याचे आयोजन ट्रूस्टर्ज नेव्हल कमांडमध्ये करण्यात येणार आहे.
- या सरावाचे मुख्य उद्दिष्ट मित्र राष्ट्रांशी असलेले संबंध दृढ करणे हे आहे.
- या सरावासाठी 41 देशांना आमंत्रित करण्यात आले आहे.
- विविध देशांसाठी नौदले या सरावात सहभागी होणार आहेत. या सरावात मोठ्या संख्येने युद्धनौका आणि मान्यवर व्यक्ती सहभागी होणार आहेत.

## मेसीला 'बॅलन डी ओर' पुरस्कार

- मेसीने सहाव्यांदा 'बॅलन डी ओर' या प्रतिष्ठेच्या पुरस्कारावर नाव कोरले आहे.
- गतवर्षीचा बॅलन डी ओर विजेता क्रोएशियाचा लुका मॉड्रीच याच्या हस्ते मेसीला पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- मेसीने सर्वाधिक 686 गुण मिळवले आहे. तर व्हर्न डिक आणि रोनाल्डो यांना अनुक्रमे 674 आणि 476 गुण मिळाले.
- रोनाल्डो 5 पुरस्कारांसह या यादीत दुसऱ्या स्थानी आहे.
- मेसीने यापूर्वी 2009, 2010, 2011, 2012 व 2015 या पाच वर्षात हा पुरस्कार मिळवला आहे.
- 2019 या वर्षात अर्जेंटिना व बर्सिलोना संघाकडून खेळताना सर्वाधिक 54 गोल केले आहेत.
- फ्रेंच साप्ताहिक 'फ्रान्स फूटबॉलद्वारे दिला जाणारा हा वार्षिक पुरस्कार आहेत. जगभरातील फूटबॉल पत्रकार या पुरस्कारासाठी मतदान करतात.

## दिनविशेष :

## 2 डिसेंबर : राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन

- 2 डिसेंबर 1984 च्या रात्री भोपाळजवळील 'युनियन कार्बाइडच्या' कारखान्यातून विषारी वायूची गळती होऊन हजारो लोक मृत्युमुखी पडले तर लाखो लोक त्याने प्रभावित झाले.
- या दुर्घटनेच्या स्मृतीत देशात 2 डिसेंबरला राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन पाळला जातो.
- औद्योगिक क्षेत्राला या घटनेची आठवण रहावी आणि यापुढे असे प्रकार घडू नयेत यासाठी जागृती पसरवण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

**पार्श्वभूमी**

- संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेनी (ILO) त्याच्या The Safety And Health At The Heart Of The Future Work - Building On The 100 Years Of The Experience या अहवालात 1984 सालच्या 'भोपाळ वायुगळती' घटनेला शतकातली सर्वात भीषण औद्योगिक घटना म्हणून नोंदवले आहे.
- मध्यप्रदेशच्या राजधानीत 'युनियन कार्बाइड' या कीटकनाशके बनविण्याच्या प्रकल्पात 'मिथाइल आयसोसायनेट' वायूची गळती होऊन किमान 6 लाखांहून अधिक मजूर व परिसरातल्या रहिवाशांना फटका बसला होता.
- अधिकृत आकडेवारीनुसार 15 हजारांवर लोकांचा मृत्यू झाला होता.
- तेथील वातावरणात विषारी कण अजूनही अस्तित्वात आहेत. त्यामुळे हजारो पीडित व त्यांची पुढची पिढी श्वसनासंबंधी आजाराचा सामना करत आहे.

**काही आकडेवारी :**

- 2018 च्या डब्ल्यूएचओ (WHO) च्या आकडेवारीनुसार जगातील दहा सर्वाधिक प्रदूषित

शहरांच्या यादीत भारतातील नऊ शहरे होती यात कानपूर अग्रस्थानी होते.
- तसेच एका अहवालानुसार जगातील 95 टक्के लोक अशुद्ध हवेचे श्‍वसन करतात.
- हवेच्या प्रदूषणामुळे सर्वाधिक मृत्यू हे भारत व चीनमध्ये होतात.
- दरवर्षी जगातील सुमारे 90 लाख लोक वायुप्रदूषणामुळे मृत्युमुखी पडतात.
- अफगाणिस्तानात दर एक लाख व्यक्तींमागे हवा प्रदूषणामुळे होणारे मृत्यू सर्वाधिक आहेत.

## 4 डिसेंबर : भारतीय नौदल दिन

- पाकिस्तानातील कराची बंदरावरील हल्ल्याचा विजय दिवस म्हणून 4 डिसेंबर हा नौदल दिन म्हणून साजरा होतो.
- 47 वा नौदल दिन ब्रीद वाक्य- "शांत परंतु सक्षम व ठोस"

**पार्श्वभूमी**
- 1971 साली बांगलादेश मुक्ती संग्रामावेळी भारत-पाकिस्तान युद्धात भारतीय नौदलाने 4 डिसेंबरच्या रात्री कराची बंदरावर विजयी हल्ला चढवला होता त्या निमित्ताने हा दिवस 'नौदल दिन' म्हणून साजरा होतो.
- त्यावेळचे नौदल प्रमुख 'एस. एम .नंदा'.
- नौदल प्रमुख नौदल प्रमुख 'करमवीर सिंह'
- 1934 साली ब्रिटिशांनी 'रॉयल इंडियन नेव्ही'ची स्थापना केली व 1950 सली तिला सध्याचे नाव प्राप्त झाले.
- क्षमतेनुसार भारतीय नौदल हे जगात सातव्या क्रमांकावर आहे.

## जागतिक मृदा दिन : 5 डिसेंबर

**सुरुवात:** 2014 पासून
- संयुक्त राष्ट्रसंघ अन्न व कृषी संघटना (UNFAO) यांच्यामार्फत दरवर्षी 5 डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिन पाळला जातो.

**उद्देश :**

i) अन्नसुरक्षा, निरोगी पर्यावरण आणि मानवी कल्याणासाठी मृदेच्या गुणधर्मांचे महत्त्व पटवून देणे.

ii) शाश्‍वत विकास, हवामान बदल, दारिद्र्य निर्मूलन इ. सारख्या गोष्टींसह अन्नसुरक्षा, कृषी यासाठी मृदेच्या महत्त्वाबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे.

**2019 ची थीम :**
- 'Stop soil erosion, save our future'

**पार्श्वभूमी :**
- वैश्‍विक मृदा भागीदारीच्या प्रस्तावानुसार 2013 मधील 'संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत दि. 5 डिसेंबर 2014 रोजी पहिल्यांदा अधिकृत 'जागतिक मृदा दिन ' पाळण्यात आला.
- हा दिवस पाळण्याची मूळ संकल्पना इंटरनॅशनल युनियन ऑफ सॉईल सायन्सेस (IUSS)द्वारा करण्यात आली होती.

**मृदा/माती :**
- मूळ किंवा जनक खडकाचे निरंतर प्रक्रियांमुळे अपक्षय (विदारण) होते. त्यामध्ये सेंद्रिय द्रव्ये, काही असेंद्रिय द्रव्ये मिसळली जातात. मृदेच्या कणांमध्ये असणाऱ्या पोकळीमध्ये वायू भरलेला असतो आणि काही प्रमाणात पाण्याचाही अंश असतो, अशा संयुक्त घटकांनी निर्माण होणाऱ्या परिपाकास मृदा असे म्हणतात.

**मृदेचे घटक :**




**मृदेची निर्मिती :**
- मृदा निर्मिती खालील घटकांवर अवलंबून असते.

**i) मूळ खडक :** एखाद्या प्रदेशात मूळ खडकाच्या प्रकारावरून त्या त्या प्रदेशात विविध प्रकारची मृदेची निर्मिती होते.

**ii) हवामान :** मृदानिर्मितीवर हवामानाचा मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. आर्द्र प्रदेशातील मृदेमध्ये आम्लाचे प्रमाण जास्त असते तर कोरड्या प्रदेशातील मृदेमध्ये चुनखडी किंवा विद्राव्य क्षार जास्त असतात.

**iii) वनस्पती व प्राणी :** सूक्ष्म जीव-जीवाणू, वनस्पती

आणि प्राण्यांची कुजण्याची क्रिया होऊन त्यापासून ह्यूमस तयार होते.

**iv) प्राकृतिक रचना :** सर्वसाधारण उंच- सखल प्रदेश व पाण्याचा योग्य निचरा असलेल्या प्रदेशात परिपक्व मृदा सापडते. पर्वतमय व तीव्र उताराच्या प्रदेशात अपरिपक्व/ निकृष्ट मृदा तयार होते. दलदलीच्या प्रदेशात परिपक्व मृदेची निर्मिती होऊ शकत नाही.

**v) काळ/वेळ :** काही ठिकाणी मृदेची निर्मिती कमी काळात होते तर इतर काही ठिकाणी मृदेच्या निर्मितीस हजारो वर्षांचा कालावधी देखील अपुरा ठरतो.

| मृदेचे प्रकार | | |
|---|---|---|
| **विभागीय मृदा** | | **आंतरविभागीय मृदा** |
| आम्लयुक्त मृदा | अल्कली मृदा | क्षारयुक्त मृदा |
| जांभी मृदा | चर्नोझम/काळी मृदा | दलदलीची मृदा |
| पॉडझॉल किंवा राखाडी | चेस्टनट मृदा | गाळाची मृदा |
| प्रेअरी मृदा | भुऱ्या रंगाची मृदा | पर्वतीय मृदा |
| तपकिरी मृदा | | चुनखडकावरील मृदा |
| टुंड्रा मृदा | | |

**मृदासंधारणाच्या पद्धती :** i) मृदेवर संरक्षित आवरण निर्माण करणे.

ii) मृदा धरून ठेवणाऱ्या पिकांची लागवड.

iii) गुरांना आणि पाळीव जनावरांना चराऊ क्षेत्रात निर्बंध

iv) पूर नियंत्रण

v) बांध-बंदिस्ती

# ईज ऑफ डुईंग बिझनेस इंडेक्स
# (Ease of Doing Business Index)

- सायमन जानकोव व (Simeon Djankov) आणि गरहार्ड पोल (Gerhard Pohl) या दोन अर्थतज्ज्ञांनी या निर्देशकांची रचना केली.
- जागतिक बँकेद्वारे ही आकडेवारी जाहीर केली जाते.
- यावर्षीच्या उद्योग सुलभता निर्देशांकात भारताची चांगली कामगिरी आहे. गेल्या वर्षीच्या निर्देशांकात भारत 77व्या स्थानी होता. यावर्षी ते स्थान 14 अंकांनी सुधारले असून सध्या भारत 63व्या स्थानी आहे.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर न्यूझीलंड यंदाही अव्वल स्थानीच आहे.
- 190 देशांचा या अहवालाचा यादीत समावेश आहे. 2014 सालापासून भारताची या यादीत कामगिरी सातत्याने चांगलीच दिसून आली आहे.

**भारताचे स्थान उंचावण्याची कारणे :**

1) नादारी आणि दिवाळखोरी संहिता, Corporate tax, अप्रत्यक्ष करप्रणालीसारख्या आर्थिक सुधारणांमुळे देशाचे स्थान सलग तिसऱ्या वर्षी उंचावल्याचे निरीक्षण आहे.

**Base of Doing Business Index मधील कामगिरी ही 12 वेगवेगळ्या निकषांवरून ठरवली जाते, ते खालीलप्रमाणे :**

1) Starting business
2) Construction Permitts
3) Getting Electricity
4) Registering property
5) Getting credit
6) Protecting Minority Investors
7) Paying taxes
8) Trade
9) Enforcing contracts
10) Resolving insolvency
11) Employing workers
12) Contracting with the governments

**यादीतील पहिले देश :**

**1)** न्यूझीलंड (2017 पासून अव्वल स्थान)
2) सिंगापूर
3) हाँगकाँग
4) डेन्मार्क
5) कोरिया

**यादीतील शेवटचे देश :**

190) सोमालिया
189) एरिट्रिया
188) व्हेनेझुएला

**आशियाई देशांची स्थाने चढत्या क्रमवारीनुसार :**

31 : चीन
63 : भारत
भूतान : 89
नेपाळ : 94
पाकिस्तान : 108
बांगलादेश : 168

**BRICS Countries :**

1) ब्राझिल - 124
2) रशिया - 28
3) भारत - 63
4) चीन - 28
5) दक्षिण आफ्रिका - 84

**महत्त्वाचे :**

यावर्षीच्या जागतिक बँकेच्या अहवालात मुंबई महापालिकेने राबविलेल्या 'ऑनलाईन बांधकाम परवानग्यांसह' अन्य उपक्रमांचाही उल्लेख आपल्या अहवालात केला आहे.